

# ही डुप्लीकेट शेरणी नाही, शेतकऱ्याची वाघीण आहे!



## बडनेरा मतदारसंघातील अठरा पगड जातींची ही लढाई

## प्रिती बंड यांच्या समर्थनार्थ गरजले बच्चू कडू



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )**–मी बडनेरामध्ये पाहत आहे, महायुतीचे उमेदवार सांगणारे रवी राणा यांच्या पोस्टरवरुन भाजपच्या नेत्यांचे फोटो गायब आहे, ऐवढंच नाही तर कथीत शेरणी सुध्दा त्यांच्या प्रचारातून बेपत्ता आहे. कारण ही डुप्लीकेट शेरणी आहे, खरंतरं शेतकऱ्याची वाघीण (प्रिती बंड) मैदानात उरतल्याने हे ढोंगी लोकं घाबरले आहे. मी जेव्हा सभास्थळी आलो, तेव्हा ही गर्दी पाहून चकीत झालो, एका अपक्ष उमेदवाराच्या प्रचारात एव्हढी गर्दी व्हावी, हा ऐतिहासिक क्षण आहे, कारण ही बडनेरा मतदार संघातील ही लढाई कुण्या एका धर्माची, जातीची किंवा उमेदवाराची राहीलेली नसून अठरा पगड जातीची ही लढाई झाली आहे. 20 रुपयांची साडी वाटून आणि 2 कोटीची गाडी वागविणाऱ्यांच्या विरोधातील हा सामना 2 कोटीची गाडीविरुध्द 'ऑटो' असा झाला आहे. दुसऱ्यांना खोके आणि ओके म्हणणाऱ्याने (रवी राणा) आता स्वतऱ्चा विचार करावा, आता जनता याचेच पैसे घेवून यालाच घरी बसविणार असल्याचा विश्वास माजी मंत्री तथा प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांनी व्यक्त केला. रविवारी (दि.17) बडनेरा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार प्रिती बंड यांच्या प्रचारार्थ बडनेरा आठवडी बाजार मैदानात आयोजित सभेत ते बोलत होते.

यावेळी मंचावर उमेदवार प्रिती बंड माजी आमदार ज्ञानेश्वर धाने पाटील, दिनेश बुब, संजय देशमुख, आशिष धर्माळे, नितीन मोहोड, जितु दुधाणे, बाबा राठोड, मंगेश मनोहरे, प्रकाश बन्सोड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

बच्चू कडू पुढे म्हणाले की, ही गर्दी कुण्या एका रंगाची नसून भगवा, हिरवा, निळा आणि पिवळा असे प्रत्येक दुपटे येथील नागरिकांच्या गळ्यात दिसत आहे. योगायोग असा प्रिती बंड यांचा बटण क्रमांक 17 आहे, संजय बंड ज्यांचे निस्सीम भक्त होते, असे बाळासाहेब ठाकरे यांचा स्मृतीदिनही आज म्हणजे 17 नोव्हेबर रोजी आहे. दिवंगत संजय बंड हे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख असताना मी तालुका प्रमुख होतो, ज्ञानेश्वर धाने पाटील यांनी आमची नियुक्ती केली होती, आज चांगला दिवस आहे, ते सुध्दा आमच्या सोबत येथे बसलेले आहेत. प्रिती बंड बरचं झाल अपक्ष उभ्या झाल्या, कदाचित येथे मशाल पेटली नसती, ऑटो धक्का मात्र निश्चित लागणार असल्याचे बच्चु कडू यावेळी म्हणाले.

**बाबासाहेब मुखात नाही डोक्यात पाहीजे!**

बच्चु कडू म्हणाले, राणा दाम्पत्य आता संविधानाची भाषा करतात, यांना संविधानाची काय जाण आहे, सायन्स्कोर मैदानाच्या प्रकरणात यांनी कायदा पायदळी तुडविला. बाबासाहेब मुखात नाही डोक्यात पाहीजे, बाबासाहेबाने मतदानाच्या लोकशाहीची जी ताकद आपल्याला दिली आहे. ती बडनेरा मतदारसंघात 'ऑटो' शिवाय कुणाचेही बटण दाबण्यात व्यर्थ जाणार नाही, असा विश्वास मला आहे. कमिशन येथील लोकप्रतिनिधी तुपाशी झाले आहे, आणि जनता उपाशी आहे. ही तुपाशी आणि उपाशी लोकांची लढाई आहे.

**नेत्यांच्या खुर्च्या धोक्यात आल्या**

75 वर्षात 50 वर्ष काँग्रेस, आणि 25 वर्ष भाजप सरकारमध्ये राहीली. परंतू साध्या शाळाही यांना निट करता आल्या नाही, यांना याची लाज वाटायला पाहीजे. श्रीमंताचं शिक्षण वेगळं आणि गरीबाचं शिक्षण वेगळं अशी इथली शिक्षण व्यवस्था आहे, जाती आणि धर्माचे भूत जनतेच्या डोक्यात टाकण्याचे काम यांनी केले. या देशात पंतप्रधान मनमोहन सिंग शिख पंतप्रधान होते, अब्दूल कलाम मुस्लिम राष्ट्रपती होते तेव्हा हिंदू खतऱ्यात नव्हता, आता कसा काय धोक्यात आला आहे, हे यांनी सांगावे. वास्तवात येथे नेते धोक्यात आले, त्यांच्या खुर्च्या धोक्यात आल्या आहे. वर्ग चार, खोल्या दोन, मास्तर एक अश्या शिक्षणव्यवस्थेविरुध्द, चांगल्या आरोग्यसाठी ही लडाई आहे. एक बेडवर दोनदोन पेशंट असतात. कुणाचे इंजेक्शन कुणाला टोचल्या जाते. ही परिस्थिती सुधारण्याकरिता आम्ही लढत आहो.

**खल्लारमधील खुर्च्यांची फेकाफेकी खरी की खोटी?**

प्रिती ताईंनी प्रहार यावं, हा विचार माझ्या डोक्यात कधी येणार नाही. कारण ना आघाडी, ना युती गेम हमारा है! आम्ही सरकार बनवायला जावू, ही निवडणूक बडनेरापुरती नाही. अहिल्यादेवी होळकरांसारखी सुरु झालेली ही लढाई, प्रितीताई लढत आहे. त्यांच्या हक्कावर वरच्या चोरट्यांनी हात मारला आहे. त्यामूळे ही लढाई अजून तीव्र झाली आहे. खल्लारमध्ये झालेली खुर्च्यांची फेकाफेकी खरी की खोटी हे तपासणे गरजेचे आहे. हे लोक स्वार्थासाठी राम वापरतात, धर्म वापरतात. यांच्या भोंदूगिरी सापडू नका, नुसतं गर्दी करुन होणार नाही, घरी गेल्यावर एक-एक फोन आपल्या नातेवाईकांना करा, ऑटो मत द्यायला सांगा. प्रितीताई कुण्या पक्षाची नाही, जनतेची आहे.

**रवी राणा तिसऱ्या नंबरवर**

आजची गर्दी पाहून रवी राणा लढतीत तिसऱ्या नंबर गेल्याचे मी विश्वासाने सांगतो, कारण तुषार भारतीय आणि प्रिती बंड यांच्यातच ही लढत होणार आहे. रवी राणाने 70 हजाराच्या विटा खाऊन फार्महाऊस बांधला, 25 लाखाचा संडास बांधला, परंतू हा ऑटो आता पाऱ्याला कोणत्याच नटात लावायच्या कामाचा ठेवणार नाही, विजय झाल्यावर ऑटो घेवून विधानभवनावर जाऊ, एक इतिहास घडवू, असे आवाहनही बच्चू कडू यांनी यावेळी केले.

**लोकवर्गणीसह पाठींब्याचा पाऊस**

पहिल्या दिवसापासून प्रिती बंड यांच्याकरिता जमा होत असलेल्या लोकवर्गणी सह पाठींब्याचा पाऊस सभास्थळीही थांबलेला नव्हता. यावेळी काही नावाने तर काही गुप्त पध्दतीने येथे बंड यांचा लढा मजबूत करण्याकरिता लोकवर्गणी जमा करित होते. सभेदरम्यान बडनेरा मतदारसंघातील तीन अपक्ष उमेदवारांसह दोन डझन विविध संघटना व मंडळांनी प्रिती बंड यांना पाठींबा घोषीत केला.

### ही परिवर्तनाची लाट आहे

प्रिती बंड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ही संविधानाची आणि जनतेची लढाई आहे, संविधानाला बेड्यांमध्ये अडकून ठेवलेल्या लोकांपासून ते आता आपल्याला मुक्त करायचे आहे. इतकी गर्दी पाहून विरोधक धास्तावले आहे, माझ्या पाठीशी माझे भाऊ आणि बहिणी पुर्ण ताकदीनिशी उभे आहेत, परिवर्तनाची लाट असली की जनता रस्त्यावर लढायला उतरते, हे आपण दाखवून दिले आहे. आज माझा भाऊ बच्चु कडू माझ्या पाठीशी उभा झाला आहे. तुम्हाला माझ्या पक्षात येण्याची गरज नाही, मी एक भाऊ म्हणून बहिणीच्या पाठीशी उभा होत असल्याचे त्यांनी सांगितले. जे लोकं संजय बंड यांच्या विचारांना या गर्दीत शोधत असतील, ते विचार घेवून आज आम्ही येथे उभे आहोत, माझ्या रुपाने तुम्हाला आज पुन्हा संजय बंड यांना विजयी करायचे आहे.

# बडनेरात परिवर्तन : नारीशक्तीचा निर्धार

## तुषार भारतीय यांच्यासाठी महिलांची स्वयंस्फुर्त महापदयात्रा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )**– बडनेरा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार तुषार भारतीय यांच्या समर्थनार्थ रविवारी (ता.17) महिलाशक्तीने स्वयंस्फुर्तीने महापदयात्रा काढून मतदारांना आवाहन केले.शेकडो महिला, युवतींच्या सहभागाने या प्रचारयात्रेने मतदारांचे लक्ष वेधून घेतले होते.आगे बढो सबसे आगे बढो या घोषणांनी प्रचारयात्रेचा परिसर दणाणून गेला.

बडनेरा मतदारसंघातून महापालिकेचे माजी सभापती तुषार भारतीय अपक्ष निवडणूक लढवित आहेत.त्यांना नारीशक्तीने समर्थन देत प्रचारयंत्रणा राबविली आहे.रविवारी सकाळी 11 वाजता नवाथे चैक येथून प्रचारयात्रेस जोशात प्रारंभ झाला.मतदारसंघातील शेकडो महिला व युवती या प्रचारयात्रेत स्वयंस्फुर्तीने सहभागी झाल्या होत्या.उमेदवारांच्या समर्थनार्थ घोषणा व भविष्यातील विकास कामांची रूपरेषा सहभागी नारिशक्तीने मतदारांसमोर मांडत सहकार्याचे आवाहन केले. नवाथे चौक येथून प्रारंभ झालेली ही प्रचार यात्रा राजापेठ,कंवर नगर,कल्याण नगर,मोती नगर अशी मार्गक्रमण करीत अंबिका नगर येथे पोहोचली.अंबिका नगर मैदानावर या प्रचार यात्रेचा समारोप झाला. गेल्या पंधरा वर्षांपासून विकासापासून दुर राहलेल्या बडनेरा मतदारसंघात यंदा परिवर्तन घडवायचा निर्धार प्रचार यात्रेतील नारीशक्तीने यावेळी व्यक्त केला.तुषार भारतीय यांची प्रचारयंत्रणाच आता नारीशक्तीने स्वयंस्फुर्तीने हाती घेतली आहे. समाजाला प्रगतीच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रमुख भूमिका बजावणाऱ्या नारीशक्तीचा निर्धार व प्रचारातील जोश वाखाणण्याजोगा होता.


महिलांनी दिलेल्या परिवर्तनाच्या घोषणांनी मतदारांचे लक्ष आकर्षून घेतले.चुल आणि मुल यापुरत्या आता महिला मर्यादीत राहल्या नसून त्या परिवर्तनही घडवू शकतात असा संदेश या महापद ?त्रेने आज दिला.बडेनरा मतदारसंघात त्यामुळे आता तुषार भारतीय यांचे पारडे जड झाले असून विरोधक चांगलेच धास्तावल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# अज्ञात वाहनाची कारला धडक, तिघांचा मृत्यू, एक गंभीर

## सुपर एक्सप्रेस हायवेवरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )**– भरधाव अज्ञात वाहनाने कारला धडक दिल्याने तिघांचा मृत्यू झाला, तर एक गंभीर जखमी झाला. अजय रामखिलावन यादव (32), ऋषिकेश ज्ञानेश्वर कराळे (32, दोन्ही रा. अर्जुननगर), रजत मेश्राम (32, रा. माहुली जहागिर) अशी मृतांची नावे आहे. तर त्याच्यासोबत असलेला सुनील लक्ष्मणराव गोंदुरवार (30, अर्जुननगर) हा गंभीर जखमी झाला असून, त्याला उपचाराकरिता जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा भिषण अपघात शनिवारी रात्री दिड वाजताच्या



सुमारास बडनेरा हद्दीतील सुपर एक्सप्रेस हायवे स्थित वडूरा गावाजवळ घडला.

पोलिस सुत्रानुसार, रजत मेश्राम, ऋषिकेश कराळे, अजय यादव व सुमित गोंदुरवार असे चार जण एमएच 27 बीएल 6699 या क्रमांकाच्या कारने शनिवारी बडनेरा सुपर हायवेवर काही कामानिमित्त गेले होते. रात्री उशिरा ते कारने परत घरी येत असताना, बडनेरा सुपर एक्सप्रेस हायवेवरील वडूरा गावाजवळ त्यांच्या कारला भरधाव अज्ञात वाहनाने धडक दिली. या भीषण अपघातात कारमधील तिघांचा मृत्यू झाला, तर एक गंभीर जखमी झाला. या घटनेच्या माहितीवरून एक्सप्रेस हायवेवरील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताची माहिती बडनेरा पोलिसांना मिळताच, पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठले. दरम्यान हायवेवरील रुग्णवाहिकेच्या मदतीने मृतक व जखमींना तत्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या तपासणीदरम्यान अजय यादव, हृषीकेश कराळे, रजत मेश्राम यांना मृत घोषीत करण्यात आले, तर सुनील गोंदूरवार याच्यावर उपचार सुरु करण्यात आले. पोलिसांनी वाहनाचा शोध सुरु केला असून, अद्याप अज्ञात वाहनाचा शोध लागलेला नाही. या याप्रकरणी बडनेरा पोलिस तपास करीत आहेत.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# माझा भाऊ प्रताप अडसड ला विधिमंडळात पाठवा!

■ विकासाच अभिवचन मी देतेय-पंकजा मुंडे

■ नांदगावच्या प्रचार सभेत उसळला जनसागर

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर,** ( दि.17 )-मतदारसंघात विकास करण्याची प्रचंड धडपड प्रताप अडसड यांच्यात आहे. माझ्या धाकट्या भावाला विधिमंडळात पाठवा या मतदारसंघाचा विकासाचे अभिवचन मी आपल्याला देते असे आवाहन माजी ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

धामणगाव विधानसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार आमदार प्रताप अडसड यांच्या प्रचार सभेत बोलताना पंकजा मुंडे बोलत होत्या. मुंडे पुढे म्हणाल्या की, भाजपा महायुतीच्या सरकारने शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे विज बिल झिरो केले, लाडक्या बहिणीच्या खात्यात 7500 रुपये जमा झाले, कृषी सन्मान योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला कृषी मालाचे वीस टक्के भावांतर सरकारने जाहीर केले. फरकाची रक्कम सरकार देणार आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवारांचे 'मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है' असे म्हणत त्यांना प्रश्न विचारा असेही मुंडे यांनी आपल्या भाषणातून सांगितले. मतदारसंघातील पंधरा वर्षाचा दडपशाहीचा कारभार आणि पाच वर्षाचा माझा कार्यकाळ यात आपण फरक पाहिला आहे. शेतकऱ्यांना दारू पाहिजे, शेतकरी महिला खर्रा खातात असे वारंवार विधान माजी लोकप्रतिनिधी करीत आहे. अशा माणसाला आपण मतदान देणार काय? असा सवाल प्रताप अडसड यांनी केला. अडीच वर्षात मतदार संघात दलित वस्त्यांचा विकास मी केला. भविष्यातही दलित बांधवांच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा राहणार असल्याचे अडसड यांनी आश्वासित केले.





# वाढत्या पाठिंबामुळे आ.यशोमती ठाकूरांचे पारडे जड

**अपक्ष उमेदवार राजेश मानकर यांचा बिनशर्त पाठिंबा**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.17 )-** तिवसा विधानसभा निवडणुकीमध्ये अपक्ष म्हणून उमेदवारी लढवीत असलेले राजेश मानकर यांनी महाविकास आघाडीचे उमेदवार यशोमती ठाकूर यांना पाठिंबा दिला आहे. या पाठिंब्यामुळे यशोमती ठाकूर यांचे पारडे जड झाले आहे, त्यामूळे त्यांचा विजयही आता निश्चित झाला आहे.

विधानसभा निवडणूक येत्या तीन दिवसानंतर होणार आहे. अशातच विविध संस्था संघटना आणि उमेदवार महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार यशोमती ठाकूर यांना पाठिंबा देत आहेत. दिवसा तालुक्यामध्ये यशोमती ठाकूर यांना मोठ्या प्रमाणात समर्थन मिळत असल्याने त्यांची बाजू भक्कम झाली आहे. विधानसभेच्या रिंगणात उतरलेल्या अपक्ष उमेदवारांनी देखील यशोमती ठाकूर यांना पाठिंबा दिल्याने त्यांचा विजय सुनिश्चित झाला आहे. महाराष्ट्र सेतू संघटना समर्थित आघाडीचे अधिकृत युवा तडफदार अपक्ष उमेदवार राजेश मानकर यांनी बिनशर्त पाठिंबा देऊन यशोमती ठाकूर यांच्या विजयासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. राजेश मानकर यांना निवडणुकीमध्ये ट्रंपेट चिन्ह मिळाले होते, परंतु त्यांनी पाठिंबा दिल्यामुळे मतदारांनी यशोमती ठाकूर यांना मोठ्या प्रमाणात मतदान करावं असे आवाहन केले आहे.



## नेतृत्वावर विश्वास-बलवीर चौहाण

यशोमती ठाकूर ह्या सर्वांना न्याय देतात त्यांनी मत्स्य व्यवसाय करणाऱ्या भोई समाजाच्या अडचणी समजून घेतल्या आहे. संत काशिनाथ महाराज मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था टाकली जहागीर च्या वतीने यशोमती ठाकुर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तिवसा विधानसभाच्या विकासासाठी तसेच अमरावती जिल्ह्यातील भोई समाज बांधवांवर येणाऱ्या समस्या सोडवण्याची त्यांच्या नेतृत्वातील क्षमता बघता ठाकूर यांच्या उमेदवारीस बिनशर्त पाठिंबा जाहीर करण्यात येत आहे असे मुख्य प्रवर्तक बलवीर चौहाण त्यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# कॉँग्रेस-भाजपने 60 वर्षात फक्त कमिशन केंद्र चालवले!

**डॉ.निलेश विश्वकर्मा यांचा घनाघाती आरोप**

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.17 )-** धामणगाव रेल्वे मतदार संघ गेल्या 60 वर्षा पासून समस्यांचे माहेर घर बनले आहे. येथील आजी-माजी आमदारांनी वारंवार सत्ता उपभोगून फक्त कमिशन केंद्र चालवले आहे. त्यामुळे या आजी-माजी आमदारांना या वेळी जनतेने हिसका दाखवावा. असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी मतदारांना केले.

विश्वकर्मा म्हणाले की, मतदार संघात गेल्या कित्येक वर्षा पासून कामे झाली नाही. ग्रामीण भागात झोपडपट्टयांमध्ये वाढ झाली, मात्र मुलभूत सुविधा झाल्या नाही. बचत गटासाठी कुठलीही व्यवस्था नाही. लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली. मात्र पोलीस स्टेशनची संख्या तीच आहे. विशेष म्हणजे महावितरण विभागाचे तक्रार निवारण केंद्रातही वाढ झाली नाही. पर्यटनाची व्यवस्था नाही, अनेक ठिकाणी पर्यटनाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाला नाही. दोन्ही आजी-माजी आमदारांनी आलटून पालटून सत्ता भोगल्याशिवाय दुसरे केले काय? असा प्रश्न जनता विचारीत आहेत. या निवडणुकीमध्ये मी काम केले म्हणून जनतेकडून मत मागत आहे. ही मतदान रुपी लढाई अकार्यक्षमते विरुद्ध कार्य क्षमता अशीच आहे. जनतेसाठी किंवा महिलांच्या सुरक्षेसाठी मंत्र्यांना सी.सी.टी.व्ही. ची लावण्याची आवश्यकता वाटत नाही. जिल्ह्यात निवडणुकीच्या तोंडावर जवळपास 10 हत्या झाल्या. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झाला आहे. परंतु त्यांचे सत्ताधाऱ्यांना काही देणेघेणे नाही, उलट जनतेच्या दारी जाऊन नीर्लज्जासारखे मते मागत आहे, असा घनाघात डॉ. निलेश विश्वकर्मा यांनी केला आहे.



# आज बच्चू कडू यांच्या समर्थनार्थ बाईक रॅली

**चांदूर बाजार येथून होणार सुरवात**

**दु.2 वाजता गांधीपूल येथे भव्य जनसभा**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.17 )-** विधानसभा निवडणुक 2024 चा प्रचार उद्या सोमवारी सायंकाळी 6 वाजता थांबणार आहे. शेवटचा दिवस असल्याने सर्वच राजकीय पक्षांचा जोर शहरात रॅली काढून प्रचारावर राहणार आहे. यामध्ये अचलपूर विधानसभा मतदार संघातील परिवर्तन महाशक्तीचे उमेदवार, प्रहारचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांच्या मतदार संघातील प्रचाराच्या झंझावाताने सर्वत्र वातावरण प्रहारमय झालेले असतांना शेवटच्या दिवशी भव्य बाईक रॅली आणि नंतर जनसभा घेऊन प्रचाराचा विजयी शेवट करणार आहे.

बच्चू कडू हे पाचव्यांदा निवडणूक रिंगणात असून त्यांनी केलेले विकासकामे, सामाजिक कामे, रुग्णसेवा, धार्मिक कार्य तसेच गोरगरीब, वंचित, दिव्यांग, कामगार, शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी या घटकांसाठी केलेली भरीव आणि ऐतिहासिक कामगिरी पुन्हा बच्चू कडू यांना विजयाच्या दिशेने घेऊन जात असल्याचे राजकीय विश्लेषक सांगतात.



## असा राहील रॅलीचा मार्ग

सकाळी 9 वाजता चांदूर बाजार येथून या बाईक रॅलीला प्रारंभ होणार आहे. शेकडो दुचाकी वाहने आनंद सभागृह येथुन निघेल त्यानंतर बेलोरा ऑटो स्टॉप, बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून बाबासाहेब आंबेडकर चौक, जयस्तंभ चौक, माधान, ब्राम्हणवाडा थडी पोलीस स्टेशन समोरुन चिचोली मार्गे चिंचोली मार्कंडा, शिरजगाव कसबा, अलमपुर, करजगाव, खरपी, परतवाडा मेन रोड, बैतुल स्टॉप, पोलीस स्टेशन परतवाडा, सदर बाजार, दुराणी चौक, जगदंबा चौक, महावीर चौक, पेन्शनपुरा, आठवडी बाजार, जयस्तंभ चौक, बस स्टँड परतवाडा, विदर्भ मिल, तहसील गेट, पोलीस स्टेशन अचलपुर चौक, टक्कर चौक, सराफा व तेथून दुपारी 2 वाजेपर्यंत गांधीपुल अचलपूर येथे बच्चू कडू यांची मोठी जनसभा होणार आहे.

## अनेक विषयांचा करतील पंचनामा

बच्चू कडू यांच्या जनसभेची सर्वांनाच उत्सुकता असून कार्यकर्त्यांमध्ये देखील उत्साह आहे. निवडणूक रणधुमाळीत कार्यकर्त्यांनी तसेच जनतेने सतत 15 दिवस स्वयंस्फूर्तीने बच्चू कडू यांच्या प्रचाराची धुरा सांभाळली, या जनसभेत बच्चू कडू जनतेच्या या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणार आहे. बच्चू कडू या ठिकाणी अनेक विषयांवर प्रहार करून आपले शक्तीप्रदर्शन करतील.अचलपूर मतदार संघात एकंदरीत परिवर्तन महशक्तीचे बच्चू कडू व महायुतीचे प्रवीण तायडे यांच्यात थेट लढत असून भाजप मधील अंतर्गत वाद, भाजपला संपविण्याचा राणा दाम्पत्याने चालविलेला डाव, कॉँग्रेसच्या उमेदवाराला भाजपची मते वळविण्याची राणांची रणनीती व एकंदरीत दुखावलेला कार्यकर्ता या सर्व प्रकारांमुळे बच्चू कडू हे अगदी विजयाच्या समीप असुन ते पाचव्यांदा विजयी होणार असल्याचे स्पष्ट चित्र आहे.

# पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती साजरी

**हिवरखेड-**येथील नागोराव दादा सदाफळे नवोदय विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये नुकतीच पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विद्यालयाचे कलाध्यापक प्रल्हाद बुले यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्विकारले. सर्वप्रथम अध्यक्षांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन केले. स्वरा भुजाडे, मानवी सदाफळे, धरती पाटील, तन्मय महल्ले, मयूर सावरकर, हर्षल पाचारे या विद्यार्थ्यांची तसेच महादेव नागदेवे, सुनीता श्रीवास, प्रल्हाद बुले इत्यादी शिक्षकांची नेहरूंच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव नागदेवे यांनी केले. याप्रसंगी संजय बोनडे, उमेश चव्हाण, श्रीकांत विघे, निलेश रायचुरा, स्वाती पारिसे, अशोक डवरे, दिलीप अजमिरे इत्यादी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



# नवनीत राणांच्या प्रचार सभेत धुडगुस

**खुर्च्यांची फेकफाक व हाणामारीत चार जण जखमी**

**खल्लार येथील प्रचारसभेत गोंधळ**

**अमरावती-** दर्यापूर विधानसभा मतदार संघातील खल्लार येथे युवा स्वाभिमानचे उमेदवार रमेश बुंदीले यांच्या प्रचारार्थ माजी खासदार नवनीत राणा यांची शनिवारी (दि.16) रात्री प्रचार सभा सुरु होती. दरम्यान सभेत जमलेल्या काही नागरिकांनी अचानक गोंधळ घालून नवनीत राणा यांच्या दिशेने खुर्च्या फेकल्याने खळबळ उडाली. यावेळी खुर्च्या फेकफाक व हाणामारी झाल्याने चार जण जखमी झाले आहे. या घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी तत्काळ खल्लार परिसरात तगडा बंदोबस्त लावून तणावाची स्थिती शांत केली. याप्रकरणात नवनीत राणा यांच्या तक्रारीवरून 40 ते 50 जणांविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे.





# प्रचारसभेतील गोंधळाचा निषेध

**युवा स्वाभिमान, भाजपकडून निषेध**

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.17 )-**युवा स्वाभिमान पक्षाचे दर्यापूर मतदारसंघातील उमेदवार रमेश बुंदिले यांच्या खल्लार येथील प्रचार सभेत काही असामाजिक तत्वांनी गोंधळ घालून खुर्च्यांची तोडफोड केली. या घटनेचा निषेध करुन यातील दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी चुरणी, काटकुंभ युवा स्वाभिमान पक्ष, भारतीय जनता पार्टी व तसेच विधानसभा मेळघाट चे सर्व महायुतीचे कार्यकर्ते यांनी जाहीर निषेध केला.

दर्यापूर मतदार संघ हा महायुतीच्या शिंदे गटाला सुटला आहे. यामध्ये शिंदे गटाचे अभिजीत अडसूळ, तर आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षातून माजी आमदार व भाजपचे निष्ठावंत रमेश बुंदेले यांच्यात लढत आहे. महायुतीमध्ये दोन गट झाले आहे. शनिवारी(दि.16) खल्लार येथे नवनीत राणा यांनी युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रमेश बुंदेले यांच्या प्रचारासाठी सभेचे आयोजन केले होते. राणा यांचे भाषण सुरू असताना काही लोकांनी या सभेला विरोध केला व सभा उधळून लावली. अश्या असामाजिक तत्वांवर कडक कारवाई करण्याची मागणी यावेळी चुरणी, काटकुंभ महायुती व भाजप कार्यकर्त्यांनी काटकुंभ पोलीस चौकी येथे निवेदन देवून निषेध नोंदविला आहे. काटकुंभ, चुरणी येथील कार्यकर्ते महेश मालविय, अर्जुन राठोर, सोनु मालविय, आयुष मालविय, राहुल गाठे, सागर मोरले, सुनिल बिलवे, निरज मालविय, निलेश राठोर, नागेश मुंडे, श्रीराम काकडे, किशोर बेठेकर, संदिप जैस्वाल, राहुल आठोले, गजा गाठे, आलोक अलोकार, सौरभ येवले, श्रीराम आठोले, शिवम सतवासे, सुभाष आठोले, भुता झारखंडे, संजु राठौर, सचिन कास्देकर, दयाराम बेठेकर, दिपक भाकरे, शिवा जैस्वाल, शिवम सतवासे, विनोद हरसुले, सुखदेव आंबेडकर इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.



# वारं आपलंच आपणच जिंकणार - देवेंद्र भुयार



■ बेनोडा शहीद येथील सभेला नागरिकांची तुफान गर्दी

■ देवेंद्र भुयारांना मतदारांचा वाढता पाठिंबा

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.17 ) -** विरोधक मला संपवायला निघाले आहेत, परंतु या निवडणुकीत जनता त्यांनाच संपविणार आहे. वरूड-मोर्शी विधानसभेत मतदार संघाच्या विकासासाठी फक्त देवेंद्र भुयारच चालते, राज्यभर महायुतीचे घटक पक्ष असलेले राष्ट्रवादी अजित पवार गटाचं वारं असून वरूड-मोर्शी विधानसभेमध्ये आपणच जिंकणार आहोत, असा विश्वास देवेंद्र भुयार यांनी शनिवार (दि.16) यांनी सायंकाळी 7 वाजता बेनोडा शहीद येथील जाहीर सभेत व्यक्त केला.

भूयार पुढे म्हणाले की, वरुड-मोर्शी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गट महायुती मित्र पक्षाचे उमेदवार देवेंद्र भुयार यांचा प्रचार जवळपास अंतिम टप्प्यात आला आहे. सर्वसामान्य जनतेसह शेतकरी, व्यापारी, उद्योजक, लाडक्या बहिणी, तरुणाई व ज्येष्ठ नागरिक देवेंद्र भुयार यांच्या प्रचारात सक्रिय झाले आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नुकत्याच झालेल्या मोर्शी येथील रोड- शोमुळे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारल्याचे दिसून येत आहे. याविषयी रोड शोच्या माध्यमातून देवेंद्र भुयार यांना विजयी करण्याचा निर्धार सर्वत्र केल्या जात आहे. येणाऱ्या काळातही वरुड मोर्शीकरांना अभिमान वाटेल, अशी कामे करू. वरुड-मोर्शी शहरासह संपूर्ण तालुक्याचा चेहरा-मोहरा बदलविणार असल्याचे आश्वासन आमदार भुयार यांनी बेनोडा शहीद येथील जाहीर सभेत दिले. त्यामुळे विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवूनच त्यांचा प्रचार सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रचार रॅली, कॉर्नर सभा, सामाजिक मेळावे आदींनी घड्याळ ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचा दावा त्यांच्या कार्यकर्त्यातर्फे केला जात आहे.

> आपण खोटे बोलून एकही काम केलेले नाही. तालुक्याचा निर्णय येथील जनतेला घ्यायचा असल्याने जनतेने विकासाला साथ दिली. त्यामुळेच आपल्याला सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.
>
> **-देवेंद्र भुयार,**
> आमदार वरुड-मोर्शी विधानसभा.

## गावागावात स्वागत

आमदार देवेंद्र भुयार व त्यांच्या पत्नी डॉ. मोनाली भुयार यांनी प्रचाराची पहिली फेरी पूर्ण केली आहे. काही भागात त्यांच्या दोन फेऱ्या देखील झाल्या आहेत. प्रत्येक गावात पती-पत्नीचे मोठ्या जल्लोषात स्वागत केले जात असल्यामुळे गावागावात त्यांच्याविषयी चांगले वातावरण आहे. त्यामुळे जनतेची सक्रियता प्रचारात अधिक दिसून येत आहे. कार्यकर्त्यांची मोठी फळी सर्वत्र तयार झाली असून एकूणच ही निवडणूक आता जनतेने हातात घेतली असल्याचे चित्र वरुड-मोर्शी विधानसभा मतदारसंघात दिसून येत आहे.



महासागर

# बडनेरा मतदारसंघात परिवर्तनाची नांदी!













